ePaper

वर्ष - 7 । अंक - 102 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । रविवार, दिनांक 13 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शरद पवार-अजित पवार भेटीमुळे राजकीय चर्चेला उधाण



## आतील पानांत


- सूर्य भाजपाच्या मालकीचा आहे का?
- मुस्लिम असण्याची शिक्षा का?
- विरोधकांचा मणिपूरशी विश्वासघात!
- भाईजानवरही गदर-2 चा फिवर !


## नितीन गडकरी यांची घोषणा : पुण्यातील चांदणी चौक उड्डाणपुलाचे लोकार्पण

# देशातून पेट्रोल-डिझेल आता ‘हद्दपार’


### » वाहननिर्मितीत देश होणार अव्वल, रस्ते अपुरे, त्यामुळे हवाई बसेसचा विचार करा!

### » राज्यात 5 वर्षांत सर्व बसेस इलेक्ट्रिक करणार




।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहर खूप प्रदूषित झाले आहे. पुण्याला पेट्रोल-डिझेलमुक्त केले, तर प्रदूषण नक्की कमी होईल. त्यासाठी यापुढे देशातूनच पेट्रोल-डिझेल हद्दपार करण्याच्यादृष्टीने इलेक्ट्रिकल, इथेनॉल, मिथेनॉल, बायो सीएनजीवर गाड्या चालविण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या दिसतील, असे केंद्रीय भुपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांनी येथे शनिवारी सांगितले. पुण्याची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हवेतून चालणाऱ्या गाड्यांची योजना विचाराधीन असून चांदणी चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्याची आणि मेट्रो सेवा सुरू करण्याची मागणी पूर्ण झाल्याचे समाधान आहे. मात्र विमानतळाचा प्रश्न अद्याप मार्गी लागला नाही, अशी खंतही गडकरी यांनी बोलून दाखविली.**



एनडीए गेट (चांदणी चौक) उड्डाणपुलाचे लोकार्पण आणि खेड, मंचर वळण रस्ता चौपदरीकरणाचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते शनिवारी झाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, उमा खापरे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दळणवळण मंत्री असल्याने पेट्रोल-डिझेल देशातून हद्दपार करण्याचे निश्चित केले आहे. पुण्याला पेट्रोल-डिझेलमुक्त केले, तर चाळीस टक्के प्रदूषण कमी होणार आहे. पुण्यात इथेनॉलचे पंप आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. मात्र या पंपातून इथेनॉल विक्री होत नाही. पुण्यातील रिक्षामध्ये बदल करण्यात आलेला नाही. रिक्षा फ्लेक्स इंजिनमध्ये रुपांतरित केल्या आणि नव्याने परवाना देताना इथेनॉल किंवा इलेक्ट्रिकचा दिला तर प्रदूषण कमी होईल आणि स्वदेशी इथेनॉल इंधनाचा वापरही वाढेल असे सांगतानाच कचऱ्यापासून ग्रीन हायड्रोजन तयार करण्याची सूचनाही गडकरी यांनी केली.

ते म्हणाले की, चांदणी चौकातील कामे पूर्ण करताना अनेक अडथळे आहे. मात्र आता वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी नवी योजना आणण्याचे विचाराधीन आहे. त्यासाठी हवेतून चालणाऱ्या गाड्यांची योजना आहे. नागपूरमधील वर्तुळाकर मार्गावर केबलद्वारे ट्रॉली बस सेवा देण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे. पुण्यानेही तसा प्रयोग करण्याबाबत गांभीर्याने विचार करावा. गडकरी पुढे म्हणाले की, मंत्री झाल्यानंतर अनेकदा पुण्यात आलो. पुणेकरांकडून तीन मागण्या होत होत्या. पुणे मेट्रोचे काम पूर्ण करण्यात यावे. तसेच एअरपोर्टचा विकास करण्यात यावा आणि चांदणी चौक पुलाचे काम करण्यात यावे. यातील दोन गोष्टी पूर्ण झाल्यात, आता मेट्रोचे कामही पूर्ण होत आहे. यासाठी मी पुणेकरांचं मनापासून अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो.

> “ वाहन निर्मिती क्षेत्रात येत्या पाच वर्षांत भारत पहिल्या क्रमांकाचा देश असेल. त्यामध्ये देशाच्या विकासाचे केंद्र पुणे असेल. त्यामुळे येथे पाणी, विजेची २४ तास उपलब्धता आणि पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करणे गरजेचे आहे. गेल्या नऊ वर्षांतील विकासामुळे भारत ही जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाली आहे. मी मंत्री झालो, तेव्हा आपण वाहन उद्योगात जागतिक स्तरावर सातव्या क्रमांकावर होतो. आता चीन, अमेरिकेनंतर तिसऱ्या क्रमांकावर भारत आहे. आगामी पाच वर्षांत आपण या क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर असू, यामध्ये पुण्याची भूमिका महत्त्वाची असेल. येथे रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात होईल.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भाजपा.

### पुण्यासाठी 40 हजार कोटींचा आराखडा

*» , “पुण्यासाठी ४० हजार कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. पुण्यात आता डबल इंजिन लागलं आहे. एक दादा होते, आता दोन दादा झाले आहेत. त्यामुळे दोघांनी मनात आणलं, तर त्यांच्या नेतृत्वाखाली पुण्याचा विकास होणारच आहे. पुण्याला पाणी, हवा आणि ध्वनी प्रदूषणातून मुक्त करणार आहे.” “पुण्यात काही ठिकाणी हवेतून चालणारी स्काय बस ( डबल – डेकर रेल्वे )आणण्याचा प्रयत्न असणार आहे. हवेतून चालणाऱ्या स्काय बसमध्ये अडीचशे लोक बसतात. अजित पवार आणि चंद्रकांत पाटील यांनी स्काय बसची मांडणी एकदा पाहावी आणि त्याचा अभ्यास करावा. कारण, पुण्यातील रस्त्यांचे रुंदीकरण होऊ शकणार नाही,” असं नितीन गडकरी यांनी म्हटलं.*

# पुण्यात शिक्षण संचालकांच्या कार्यालयात पालकांचा ठिय्या

## गणवेश व पाठयपुस्तके न मिळाल्याने पालक संतप्त

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आरटीईच्या विद्यार्थ्यांच्या संतप्त पालकांनी विद्यार्थ्यांसमवेत शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र यांच्या कार्यालयात शासन व सिम्बॉयसिस शाळेच्या विरोधात ठिय्या आंदोलन केले. केंद्र शासनाच्या शिक्षण हक्क 2009 कायद्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेश व पाठयपुस्तके देण्यात यावे, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी पालकांसमवेत 110 विद्यार्थ्यांनी "शिक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे"आठवीनंतर आमचं भविष्य काय" अशा घोषणा देऊन संचालक कार्यालय परिसर दणाणून सोडला.**




केंद्र शासनाच्या शिक्षण हक्क 2009 कायद्यानुसार आर्थिक दुर्लभ व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. या कायद्यानुसार संबंधित पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. मात्र बड्या व महागड्या शाळेमध्ये महागडे गणवेश व पाठयपुस्तके घेण्यासाठी शाळेकडून पालकांवर दबाव केला जातोय. त्याचा परिणाम हा विद्यार्थ्यांवर होताना दिसून येतोय. आरटीई कायद्यानुसार कलम 12 (1) ( C) खासगी व विनाअनुदानित शाळांना मोफत गणवेश व पाठयपुस्तके विद्यार्थ्यांना पुरवणे अनिवार्य आहे.

मात्र कायद्याची पायमल्ली करत विदयार्थ्यांना गणवेश व पाठयपुस्तके मागील वर्षांपासून दिले नाहीत. यामुळे गेल्या दिड वर्षांपासून हे पालक शिक्षण विभागाच्या पायऱ्या झिजवत आहेत. आरटीई अंतर्गत 8 वी पर्यंत प्राथमिक शिक्षण दिले जाते. ह्या शाळेचे 8 वी नंतर दुसऱ्या शाळेत मुलांना शिक्षण पूर्णपणे वेगळे असते. त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर परिणाम होईल. यामुळे त्याची मर्यादा 12 पर्यंत करण्यात जेणेकरून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, अशी मागणी पालकांनी केली.

> शिक्षण संचालकांनी गणवेश व पाठपुस्तके देण्यास शाळेस पत्र दिले आहे. तरीही शाळेकडून मुजोरी करून गणवेश व पाठपुस्तके देणार नाही असे सांगितले जात आहे. शाळा संचालकांच्या पत्रालाही केराची टोपली दाखवली जात आहे. शाळा जर संचालकांचे ऐकत नसेल तर न्याय मागायचा कुणाकडे ?
> **- विनोद डोळस,** पालक.

> आपल्या पाल्याला चांगल्या व मोठ्या शाळेत 12 वी पर्यंत शिकवता येईल, या उद्देशाने आरटीई अंतर्गत प्रवेश घेतला. परंतु आता अनुभव खूप विचित्र येत आहे. आता केवळ आठवी पर्यंत मोफत शिक्षण देणार . नंतर 9 वी ला शाळेची फी 5 लाख एवढी आहे. ती भरायची कुठून आणि शाळा बदलली तर दुसऱ्या शाळेचे शिक्षण हे पूर्ण वेगळे आहे. तर मुलाच्या भविष्याचा काय असा प्रश्न पडतोय.
> **- विपीन खंडागळे,** पालक.

# अजित पवार-शरद पवार यांची पुण्यात भेट

## उद्योजक अतूल चोरडिया यांच्या घरी भेटीवर शिक्कामोर्तब

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात भेट झाली आहे. उद्योजक अतुल चोरडिया यांच्या घरी दोन्ही नेत्यांची बैठक झाली असल्याचं समोर आलं आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील देखील बैठकीला उपस्थित होते. पुण्यातील चांदणी चौकातील कार्यक्रमाला अजित पवार उपस्थित होते. तर, आज वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीनिमित्त मांजरी येथे होते. शरद पवार आणि जयंत पाटील मांजरी येथून निघून कोरेगाव पार्क येथील चोरडिया यांच्या घरी होते. दुपारी एकनंतर अजित पवारांनी त्यांचा ताफा सोडला आणि त्यांच्या गाडीतून कोरेगाव पार्कमध्ये पोहोचले होते.**

### अजित पवार राष्ट्रवादीत परत येणार की शरद पवार भाजपासोबत जाणार?

शरद पवार हे दुपारी साडेबाराच्या सुमारास मांजरी येथून निघाले आणि सव्वा एकच्या दरम्यान कोरेगाव पार्कला भेटले. अजित पवार एक वाजता चांदणी चौकातील कार्यक्रम संपल्यानंतर चोरडियांच्या घरी पोहोचले. अजित पवारांनी ताफा सर्किट हाऊसला सोडला आणि त्यांची गाडी कोरेगाव पार्कला पोहोचले. दुपारी दोन ते पावणे पाचच्या दरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये कोणत्या गोष्टींवर चर्चा हे येणाऱ्या काळात समोर येईल.

शरद पवार पावणे पाचला अतुल चोरडिया यांच्या घराबाहेर पडले. त्यानंतर अजित पवार घरी आले नसल्याचं अतुल चोरडिया यांनी नाकारलं होतं. मात्र, त्यांनी दिलेली माहिती असत्य असल्याचं समोर आलं आहे. अजित पवार चोरडिया यांच्या घरातून बाहेर पडताना माध्यमांच्या कॅमेऱ्यात कैद झालं आहे. शरद पवार निघून गेल्यानंतरही जयंत पाटील अतुल



चोरडिया यांच्या निवासस्थानी होते. अजित पवार बाहेर पडण्याच्या अगोदर जयंत पाटील २० मिनिटं निघून गेल्याचं समोर आलं आहे.

दरम्यान, या भेटीमुळं राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेमकं काय सुरु आहे हे येणाऱ्या काही दिवसांमध्ये स्पष्ट होईल.

# ‘आरपीआय’ लोकसभा लढवणार!

## महायुतीकडे दोन जागांची मागणी करणार : केंद्रीय मंत्री रामदास आठवले

### महापालिकेत हव्या 15 जागा : शहरातील कार्यकर्त्यांना दिले बळ

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाच्या लोकसभेत आरपीआय आठवले गटाचे लोकप्रतिनिधीत्व निवडुन यावेत यासाठी पक्षाकडून चाचपणी सुरू आहे. नुकतेच त्याबाबत सूचक वक्तव्य केंद्रीय सामाजिक व न्यायमंत्री रामदास आठवले यांनी पिंपरीत केले आहे. निवडणुकीसाठी दोन जागांचा आग्रह ‘एनडीए’कडे करणार असल्याचे मंत्री आठवले यांनी सांगितले आहे.**



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या सोबत चर्चा करून मार्ग काढणार आहे. मुंबई, अहमदनगर आणि विदर्भात मोठी ताकद असून त्या बाबत चर्चा करून जागा मागणार असल्याचेही केंद्रीय मंत्री आठवले म्हणाले.

पिंपरीत विविध कार्यक्रमानिमित्त केंद्रीय मंत्री रामदास आठवले उपस्थित राहिले होते. या वेळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी आपली भूमिका मांडली. या वेळी आरपीआयचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब भागवत, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, कुणाल वव्हाळकर, सुधाकर वारभुवन, अजिज शेख आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री आठवले म्हणाले की, सध्या आम्ही पक्ष बांधणीवर भर दिला आहे. राज्यभरात शिबिरे आयोजित करून पक्षवाढीसाठी प्रयत्न चालू केले आहेत. मुंबई, सातारा, यवतमाळ या ठिकाणी पक्षाने शिबिरे आयोजित केली आहेत. नागालँडमध्ये पक्षाचे दोन आमदार विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात देखील मुंबई आणि विदर्भामध्ये पक्षाची मोठी ताकद आहे. या बरोबरच या पुर्वी मी अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी लोकसभा मतदारसंघातून खासदार होतो. त्या ठिकाणीही पक्षाची मोठी ताकद आहे. मी तिथून लढावे की नाही हे चर्चा करून ठरविणार आहे. मला ती जागा सोडलीच तर केंद्रात मंत्री असल्यामुळे त्याचा फायदा अहमदनगर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना होईल, असे मंत्री आठवले म्हणाले.

#### विरोधकांच्या गोंधळामुळे मणिपूरवर चर्चा नाही

» केंद्र सरकारच्या सबका साथ सबका विकासाला आरपीआयचा पाठिंबा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात आंबेडकरी समुदायाचे प्रश्न सुटले. देशाचे संविधान बदलण्याची काही लोक अफवा पसरवत आहेत. तसे काही होणार नाही. मणिपूरमध्ये शांतता राहावी, हीच केंद्राची इच्छा आहे. दोन्ही समुदायाच्या लोकांना शांत राहण्याचे आवाहन मोदी सरकारने केले आहे. संसदेच्या अधिवेशनात यावर चर्चा करण्यात येणार होती. मात्र विरोधकांनी जाणिवपुर्वक गोंधळ घालून ही चर्चा बंद पाडल्याचे आठवले म्हणाले.

#### महापालिकेसाठी 15 जागांवर दावा...

» राज्यातील महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून आहेत. डिसेंबर किंवा जानेवारी दरम्यान लागण्याची शक्यता आहे. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेत आरपीआयच्या वतीने 15 जागांवर दावा केला जाणार आहे. चर्चेनुसार किती जागांवर लढायचे ते ठरविले जाईल, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले म्हणाले. त्यामुळे शहरातील आरपीआयच्या कार्यकर्त्यांना बळ मिळाले आहे.

# निरोगी जीवनासाठी शिबिराचा लाभ घ्या!

## सौ. कुंदाताई भिसे यांचे आवाहन : उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे आरोग्य शिबीर

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. दैनंदीन गरजा भागवण्यासाठी जीवाचे राण करावे लागत असल्यामुळे तणाव वाढत चालला आहे. ऐन तिशीत तरुणांना असह्य आजार जडू लागले आहेत. यावर वेळीच उपाय शोधून जीवघेण्या आजारातून स्वतःला मुक्त करण्यासाठी आरोग्य शिबिर घेऊन समाजाप्रती बांधिलकी जपण्याचे काम उन्नतीच्या माध्यमातून सुरु आहे; त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा भाजपा महिला मोर्चा चिंचवड विधानसभा अध्यक्षा सौ. कुंदाताई संजय भिसे यांनी केले.**




स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाऊंडेशन, मा. चंद्रकांतदादा पाटील समर्थ युवा फाऊंडेशन व बघतोय रिक्षावाला फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन अध्यक्षा सौ. कुंदाताई संजय भिसे व डॉ. केशव क्षीरसागर यांच्या हस्ते शनिवारी (दि. 12) सकाळी झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. हे शिबिर पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाऊंडेशन कार्यालय याठिकाणी शनिवारी सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत करण्यात आले. व शिबिराचा लाभ 217 लोकांनी घेतला.

यावेळी डॉ. केशव क्षीरसागर, संस्थापक श्री संजय भिसे, मनोज ब्राह्मणकर, रविंद्र पाटिल, उदय डांगे, मोहन बामणे, पराजी शिंगाडे, जेतलाल जाधव, अर्जुन उपळे, रमेश जाधव, सुनील लवटे, लक्ष्मण जाधव, दत्ता लोकरे, रमेश दुकळे, अनिल गीते, दीपक बनसोडेबघतो रिक्षावाला फोरम महाराष्ट्र सचिव. संतोष उबाळे. पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष संतोष भोसले. गोपाल बांदल. उपाध्यक्ष मुन्ना पठाण. उपाध्यक्ष महेश लंकेश्वर. विकास वाघमारे. पिंपरी चिंचवड शहर संघटक रवी जगताप. पिंटू हनवते. मनीष सावंत. नजर सौदागर. देवेंद्र शिंदे. सोमनाथ सातपुते. प्रमोद नाईक नवरे. विशाल देठे, शांताराम बैसाने, अविनाश गोसावी आदी उपस्थित होते.

शिबिरात रक्त तपासणी, रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल, ब्लड काऊंट, रक्त दाब, छातीचा एक्सरे, तोंडाचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग अशा अंदाजे 10 हजार रुपये खर्चाच्या तपासण्या पूर्णपणे मोफत केल्या जात आहेत.

> “ उन्नतीच्या माध्यमातून पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांसाठी वेळोवेळी सामाजिक उपक्रम घेतले जातात. त्याचा असंख्य गरजू नागरिकांना फायदा होता आहे, ही आनंदाची बाब आहे, अशीही भावना सौ. कुंदाताई भिसे यांनी व्यक्त केली.व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उन्नती सोशल फाऊंडेशनचे सल्लागार सागर बिरारी यांनी केले
>
> – **सौ. कुंदाताई भिसे,** अध्यक्षा, उन्नती फाउंडेशन.

# परिस्थिती कधी सुधारणार ?




**महागाईच्या निमित्ताने खाद्यान्नाच्या किमती सातत्याने वाढणे ही भारतीय अर्थव्यवस्थेपुढील एक मोठी समस्या आहे. इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत देशातील धान्याच्या उत्पादनवाढीसाठी काहीही केले नाही. एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून भारतातील लोकसंख्या वेगाने वाढू लागली.**



त्यामुळे धान्योत्पादनातील तुटीचा प्रश्न महत्त्वाचा झाला. त्यावेळी इंग्रजांनी ब्रह्मदेशातून तांदूळ आयात करून मागणी आणि पुरवठा यात मेळ प्रस्थापित करण्याचा प्रयास केला. पुढे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अशा आयातीला काही प्रमाणात खीळ बसली आणि त्यामुळे देशातील धान्याच्या तुटीचा प्रश्न ऐरणीवर आला. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अल्पवधित इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य दिले. त्यामुळे १९४७ नंतर धान्योत्पादनातील तूट ही समस्या स्वतंत्र भारताच्या सरकारसाठी डोकेदुखी ठरली.

भारताला स्वातंत्र्य देताना इंग्रजांनी देशाची फाळणी केली. त्यामुळे संपूर्ण सिंध प्रांत आणि पंजाब प्रांताचा सुमारे अर्धाभाग पाकिस्तानला मिळाला. हे दोन प्रांत ही भारतातील धान्याची कोठारे होती. हे प्रदेश गमवल्यामुळे देशातील भुकेची समस्या अधिकच उग्र झाली. अशावेळी प्राप्त परिस्थितीला धीराने तोंड देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आणि धान्योत्पादनात वाढ करण्यासाठी नेटाने प्रयास करणे सुरू ठेवले. सरकारच्या अशा प्रयत्नांना मध्यम पल्ल्याच्या काळात यश मिळाले आणि १९४७ साली धान्याचे जेवढे उत्पादन होत होते त्यात १९६३ सालापर्यंत सुमारे ५० टक्क्यांची वाढ झाली. अशा रीतीने धान्याचे उत्पादन वाढत गेल्यामुळे असणारी मागणी आणि पुरवठ्यात मेळ प्रस्थापित झाला आणि त्यामुळे भाववाढीची समस्या आटोक्यात राहिली. देशातील भाववाढीची समस्या नियंत्रणात राहण्यासाठी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी बजावलेली भूमिकाही धान्याच्या उत्पादनातील वाढीएवढीच महत्त्वाची होती. पंतप्रधान नेहरू यांचा व्यापारी आणि सधन शेतकरी या गटांवर वचक होता. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत व्यापारी आणि श्रीमंत शेतकरी यांनी धान्याचे भाव वाढवून गोरगरीबांना लुटण्याचे धाडस केले नाही. १९६४ साली नेहरूंचा मृत्यू झाला आणि व्यापारी व सधन शेतकऱ्यांवरील अंकुश दूर झाला. पुढे व्यापारी आणि सधन शेतकरी यांनी बाजारपेठेतील धान्याचा पुरवठा कृत्रिमरित्या मर्यादित करून भाववाढीचे दुष्टचक्र सुरू केले. वास्तविक नेहरू गेले तेव्हा देशात धान्याचे विक्रमी उत्पादन झाले तरीही भाववाढीची समस्या उग्र झाली. त्यामुळे केंद्र सरकारवर देशातील शहरी विभागांमध्ये संविधिक (स्टॅच्युटरी) रेशनिंग व्यवस्था सुरू करण्याची वेळ आली. १९६५ आणि १९६६ या लागोपाठच्या दोन वर्षांत भारतात मोठा दुष्काळ पडला. धान्योत्पादनात प्रतिवर्षी सुमारे २० टक्क्यांची घट झाली. देशात भूकबळी जाऊ नयेत म्हणून अमेरिकेतून मोठ्या प्रमाणावर धान्य आयात करण्याची वेळ आली. तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून धान्याची खरेदी करण्यासाठी भारताकडे परकीय चलन उपलब्ध नव्हते. त्यामुळे अमेरिकेकडून पी. एल. ४८० कलमाअंतर्गत मिळणाऱ्या धान्यावर शहरात राहणाऱ्या भारतीयांना गुजराण करावी लागत होती. याच काळात पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशवासियांना आठवड्यातून एकवेळ उपास करण्याचे आवाहन केले होते. थोडक्यात धान्याच्या उपलब्धतेसंदर्भातील स्थिती खूपच वाईट होती. परदेशावरील अवलंबित्व संपविण्यासाठी भारत सरकारने १९६५ साली हरितक्रांतीचा मार्ग अवलंबला. अधिक उत्पादक वाणांचा वापर करून धान्योत्पादनात भरघोस वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांनी हात आखडता न घेता रासायनिक खतांचा वापर करणे गरजेचे होते. त्यासाठी १९६५ साली केंद्र सरकारने 'कृषी मूल्य आयोगा'ची स्थापना केली. या आयोगाने शेतकऱ्यांनी पेरा करण्यापूर्वी धान्याचे किमान आधार भाव जाहीर करण्यास आणि सरकारने किमान आधार भावाने काही प्रमाणात तांदूळ आणि गहू खरेदी करण्यास सुरुवात केली. या धोरणामुळे दरवर्षी धान्याच्या भावांत वाढ होऊ लागली.

## संपादकीय »

### विज्ञानाची 'साडेसाती'

***दरवर्षी जानेवारी ते मार्चदरम्यान या पुरस्कारासाठी नामांकने मागवली जातात. पण या वर्षीच्या पुरस्कारांसाठी ती मागवलीच गेली नाहीत.***

एखाद्या धर्मनिरपेक्ष देशात टीव्हीवर रामायण सुरू झाल्यावर टीव्हीला हळदीकुंकू वाहणारे प्रेक्षक असतात, हे समजण्यासारखे आहे. पण त्याच देशात 'राफेल' विमानाच्या चाकांखाली लिंबू-मिरची ठेवली जाते, संसदेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन होमहवन करून केले जाते, त्यासाठी एरवी मंदिरांमध्येच असायला हवीत अशी भगवी वस्त्रधारी मंडळी संसदेच्या आवारात वावरतात, याचा अर्थ कसा लावायचा? सरकारी कार्यालयांमध्ये दरवर्षी सत्यनारायणाची पूजा घातली जाते, याचे स्पष्टीकरण कसे द्यायचे? आजकाल चर्चिलेही न जाणारे हे प्रश्न इथे मांडण्यासाठी निमित्त ठरली आहे, ती 'द इंडियन एक्स्प्रेस' या वृत्तपत्रात नुकतीच प्रसिद्ध झालेली शांतिस्वरूप भटनागर या देशातील सर्वोच्च वैज्ञानिक पुरस्कारांबद्दलची एक बातमी. दरवर्षी २६ सप्टेंबर रोजी म्हणजे वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या स्थापनादिनी जाहीर केले.

**जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करावी, या मागणीसाठी केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध ६० संघटनांनी नवी दिल्लीच्या रामलीला मैदानात नुकतेच आंदोलन केले. सरकारने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी या मागणीवर निर्णय घ्यावा अशी त्यांची मागणी असल्याने केंद्र सरकारच्या चिंतेत नक्कीच भर पडली असणार.**

# आता काय करणार?

रेल्वे, संरक्षण तसेच विविध सार्वजनिक उपक्रमांतील कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले होते. जुन्या निवृत्तिवेतन योजनेसाठी केंद्राच्या पातळीवर झालेले हे पहिलेच मोठे आंदोलन. लोकसभा निवडणुकीपर्यंत हा मुद्दा तापत राहील याचीच ही लक्षणे आहेत. या आंदोलनात सहभागी झाल्यास पगार कपात किंवा शिस्तभंगाची कारवाई केली जाईल हा कार्मिक मंत्रालयाने दिलेला इशारा धुडकावून मोठ्या प्रमाणावर कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते. केंद्र सरकारने १ जानेवारी २००४ पासून कर्मचाऱ्यांकरिता नवीन निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. नवीन निवृत्तिवेतन योजना ही कर्मचाऱ्यांच्या योगदानावर आणि बाजाराशी संलग्न आहे. याउलट जुन्या निवृत्तिवेतन योजनेत निवृत्तीच्या काळातील वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तिवेतन स्वरूपात मिळते. जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची




केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मागणी हा आता राजकीय मुद्दा झाला आहे. हिमाचल प्रदेश किंवा कर्नाटक विधानसभा निवडणुकांमध्ये हा मुद्दा गाजला. हिमाचल प्रदेशमधील निवडणुकीत सत्ता गमाविण्यात जुन्या निवृत्तिवेतन योजनेला केलेला विरोध भाजपला चांगलाच महागात पडला होता. हिमाचलमधील पराभवास जुनी निवृत्तिवेतन योजना कारणीभूत ठरल्याचा अहवाल भाजपच्या स्थानिक नेत्यांनी भाजपच्या केंद्रीय नेत्यांना पाठविला होता. आपल्या राज्यातील नागपूर शिक्षक, मराठवाडा शिक्षक वा अमरावती पदवीधर मतदारसंघातील भाजपच्या पराभवासही जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा मुद्दा प्रभावी ठरला होता. कारण राज्यात जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची मागणी गेल्या हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे फेटाळून लावली होती. काँग्रेसशासित राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची घोषणा झाली आणि विविध राज्यांमध्ये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मागणी होऊ लागली. सरकारी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या मतांसाठी जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याच्या आश्वासनाबरोबरच विविध सवलतींची खैरात राजकीय पक्षांकडून केली जाऊ लागल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'रेवडी संस्कृती'ची अनेकदा खिल्ली उडविली आहे. करदात्यांच्या पैशांचा विनियोग चांगल्या कामासाठी व्हावा, असा सल्लाही मोदी यांनी दिला होता.

## ।। अभंगवाणी ।।



त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा ।
कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥

मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा ।
अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सूर्य भाजपाच्या मालकीचा आहे का?

## » उद्धव ठाकरे गटाचा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मणिपूर हिंसाचाराच्या मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात विरोधी पक्षांनी अविश्वास ठराव आणला. संख्याबळाच्या जोरावर हा ठराव पारित होणार नाही हे विरोधकांना माहिती असूनही मोदींना मणिपूर हिंसाचारावर बोलतं करण्यासाठी विरोधकांनी हा ठराव मांडला. या ठरावावर भूमिका मांडताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जवळपास दोन तासांहून जास्त वेळ भाषण केलं.**

या भाषणावर विरोधकांकडून तीव्र शब्दांत टीका केली जात आहे. मोदींनी भाषणात फक्त काही मिनिटेच मणिपूरवर भाष्य केलं असून इतर सगळा वेळ काँग्रेसवर टीका करण्यातच घालवला, अशी टीका विरोधकांकडून केली जात आहे. यासंदर्भात ठाकरे गटाकडून मोदींना लक्ष्य करण्यात आलं आहे. मोदींनी काँग्रेसवर टीका करणं, ही राजकीय दिवाळखोरी असल्याची टीका ठाकरे गटानं सामनातील अग्रलेखातून केली आहे. “मणिपूर समस्येचे खापर त्यांनी पंडित नेहरूंवर फोडले. मग मागच्या दहा वर्षांत तुम्ही सत्ता भोगून काय केलेत? मोरारजी देसाई, अटल बिहारी वाजपेयी, व्ही. पी. सिंग हे बिगर काँग्रेसी पंतप्रधान झाले व आता दहा वर्षे स्वतः मोदी पंतप्रधान असूनही मणिपूरचे खापर नेहरूंवर फोडणे ही



राजकीय दिवाळखोरीच. मणिपुरात महिलांची नग्न धिंड काढली जात असताना मोदी पंतप्रधान आहेत व लोक मोदींना जाब विचारीत आहेत. यात नेहरूंचा दोष काय?” असा सवाल ठाकरे गटानं उपस्थित केला आहे. “मणिपूरमध्ये लवकरच शांतीचा सूर्य उगवेल, असे आश्वासन पंतप्रधान मोदी यांनी संसदेत दिले. ‘इंडिया’ पक्षाने आणलेल्या अविश्वास ठरावामुळे पंतप्रधानांना लोकसभेत येऊन बोलावे लागले. दोनेक तासांच्या भाषणात मणिपूरवर ते फक्त चार मिनिटे बोलले. बाकी सर्व पुराण तेच तेच आणि तेच त्यांनी काँग्रेसवरच लावले. या त्यांच्या मानसिक यातना आहेत. पंडित नेहरूंचे जागतिक मोठेपण, काँग्रेसचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य या मोदींच्या यातना आहेत व दहा वर्षे सत्ता भोगूनही मोदी यातनांतून दूर होऊ शकलेले नाहीत”, अशा शब्दांत ठाकरे गटानं मोदींना लक्ष्य केलं आहे. दरम्यान, मोदींच्या एका वाक्यावरून ठाकरे गटानं मोदींना टोला लगावला आहे. “आता मोदी म्हणतात, मणिपुरात शांतीचा सूर्य उगवेल. तुम्ही सांगाल तेव्हा उगवायला सूर्य भाजपच्या मालकीचा आहे काय? अविश्वास ठरावाच्या निमित्ताने अनेकांचे मुखवटे गळून पडले व सत्ता पक्षाची चिडचिड अनुभवता आली. संसदेतून बाहेर फेकलेले राहुल गांधींचे भाषण हे त्या चिडचिडीमागचे मुख्य कारण. दहा वर्षांपूर्वीचे राहुल गांधी आज राहिलेले नाहीत. सत्यवचनी व बेडर गांधींसमोर मोदी-शहांच्या नेतृत्वाची कसोटी लागत आहे”, असेही अग्रलेखात म्हटलं आहे.

### हे मोदी-शाहांचे मानसिक दौर्बल्य

» २०१४ व २०१९ असा दोन वेळा काँग्रेसचा पराभव करूनही या दोघांना २०२४ साली काँग्रेसची भीती वाटते व ते काँग्रेसवरच हल्ला चढवत आहेत. हे त्यांचे मानसिक दौर्बल्य आहे. मणिपूर प्रश्नावर राजकारण न करण्याचे पंतप्रधान मोदी यांनी आवाहन केले. मोदी यांनी २ तास १३ मिनिटांचे भाषण केले. त्यात २ तास १० मिनिटे राजकारण व उरलेली ३ मिनिटे मणिपूर होते. अविश्वास ठरावाच्या दरम्यान मोदी-शहा हे पूर्ण काँग्रेसमय झाल्याचे दिसून आले”, असंही अग्रलेखात म्हटलं आहे.

# CM शिंदेंची प्रकृती खूप खराब

## » 15 ऑगस्टनंतर त्यांना ॲडमिट करणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती खूप खराब आहे. त्यामुळे आम्ही त्यांना 15 ऑगस्टनंतर बळजबरीने रुग्णालयात ॲडमिट करणार आहोत, अशी माहिती शिवसेनेच्या शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी शनिवारी दिली. त्यांच्या या विधानामुळे मुख्यमंत्र्यांच्या प्रकृतीविषयी उलटसूलट चर्चा सुरू झाली आहे.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या सातारा जिल्ह्यातील आपल्या दरे या मूळगावी गेले आहेत. ते पुण्यातील चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या लोकार्पण सोहळ्यालाही उपस्थित राहिले नाही. प्रारंभी ते या कार्यक्रमाला ऑनलाइन हजर राहतील असे सांगण्यात आले. पण ते ऑनलाइनही हजर राहिले नाही. त्यातच आता संजय शिरसाट यांनी त्यांच्या तब्येतीविषयी उपरोक्त विधान केल्यामुळे नवी चर्चा रंगली आहे. मुख्यमंत्री शिंदेंच्या प्रकृतीची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. एक दिवस त्यांची तब्येत ठिक नव्हती म्हणून ते गावी गेलेत. आपल्या गावी जाऊन 1 दिवस आराम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ते लंडनला गेले नाहीत, असा टोलाही शिरसाट यांनी यावेळी ठाकरे गटाला हाणला. सत्ताधारी पक्षांत पालकमंत्रीपदावरूनही कोणतीही नाराजी नाही. काहीजण जाणीवपूर्वक अशा बातम्या पसरवत आहेत. त्यांना काम नाही म्हणून असली विधाने सुरू आहेत, असे शिरसाट म्हणाले.

यावेळी त्यांनी संजय राऊत यांच्यावरही निशाणा साधला. संजय राऊत यांनी स्वतःचा पक्ष सांभाळावा. त्यांना तातडीच्या उपचारांची गरज आहे. त्यासाठी त्यांना तत्काळ ॲडमिट करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. शिरसाट यांनी यावेळी मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात कोणतेही शीतयुद्ध सुरू नसल्याचेही स्पष्ट केले. अजित पवारांनी वॉर रूममध्ये घेतलेली बैठक असो की मंत्र्याकडून होणारे झेंडा वंदन असो, यावरून राज्यात चर्चेला उधाण आले आहे. पण आम्ही सर्वजण मिळून काम करत आहोत.



### काय म्हणाले संजय शिरसाट ?

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे 24 तास काम करतात. हे अवघ्या महाराष्ट्राला माहिती हे. आम्ही सर्व आमदारांनी त्यांना डॉक्टरांकडे जाण्याची विनंती केली आहे. 15 ऑगस्ट नंतर आम्ही त्यांना 'बळजबरी'ने... हा शब्द मुद्दाम लक्षात ठेवा. आम्ही त्यांना बळजबरीने हॉस्पिटलमध्ये पाठवणार आहोत. त्यांची तब्येत एवढी खराब आहे की, त्याची कल्पना तुम्हाला नसेल. आम्ही जवळ राहतो. आम्हाला माहिती आहे, असे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

# आमच्यात कोल्डवॉर नाही : अजितदादा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मुख्यमंत्र्याच्या एका बाजूला देवेंद्रजी होते, दुसऱ्या बाजूच्या रिकाम्या जागेवर मी उभा राहिलो; आमचे काय चुकले? असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमाला आले नाही, त्यावर अजित पवारांनी स्पष्टीकरण केले. मुख्यमंत्र्यांची प्रकृती खराब होती, त्यामुळे ते आले नाही. याची माध्यमांनी नोंद घ्यावी, असा टोलाही त्यांनी लगावला. चांदणी चौक येथील उड्डाणपुलाच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. आम्ही काय बेअक्कल आहोत का? एकाच खुर्चीवर दोघांचा डोळा कसा असेल? आम्ही बोललो नाही तर दुसरी बाजू स्पष्ट होत नाही. त्यामुळे मला बोलावे लागत आहे. आम्ही काम करणारे माणसे आहोत. आम्हाला फक्त काम करायचे असल्याचे ते म्हणाले. पुण्याचे झेंडावंदन हे परंपरेप्रमाणे राज्यपाल करतात. याची माहिती नसल्याने पत्रकार काहीही बातम्या करतात, असेही ते म्हणाले. मेट्रो प्रवासादरम्यान मी प्रवाशांची चर्चा केली. सकाळी सहा वाजता मेट्रो सुरू करण्याची मागणी प्रवाशांनी केली. तसे निर्देश आम्ही देत असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरळ भाषणातच दिले. पुण्याच्या पालकमंत्री पदावरुन कोणताही वाद नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमच्यावर टीका करणाऱ्यांना वेड लागलय का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

विरोधी पक्ष नेते नवीन आहेत, असे म्हणत त्यांनी विजय वडेट्टीवर यांच्यावर टीका केली. विजय वडेट्टीवार यांना कुठे शितयुद्ध दिसले. आमच्यात शितयुद्धच नाही तर साधेही युद्ध नसल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री म्हणून शिंदे यांचे चांगले काम सुरू आहे. माझ्यात आणि त्यांच्यात कोणतेही वाद नसल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस हे दोघेही पुण्याचे आहेत. त्यांनी नागपूरच्या आधी पुण्याला मेट्रो द्यायला हवी होती, अशी खंतही अजित पवार यांनी व्यक्त केली.

# मुस्लिम असण्याची शिक्षा का?

## » PM ने मुस्लिमांच्या मन की बात ऐकावी: बुखारी


। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीच्या जामा मशिदीचे शाही इमाम सय्यद अहमद बुखारी यांनी शुक्रवारी (11 ऑगस्ट) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नूंहमधील जातीय हिंसाचाराबद्दल आवाहन केले. ते म्हणाले की, पंतप्रधान मन की बात करतात, त्यांनी मुस्लिमांच्या मन की बातही ऐकावी. सध्याच्या परिस्थितीमुळे मुस्लिम चिंतेत आहेत, देशाचे भविष्य काय असेल? असा विचार ते करत आहेत.**

केवळ मुस्लिमच नाही तर हिंदू, ख्रिश्चन आणि शीखही हाच विचार करत आहेत. एका धर्माला मानणाऱ्यांना खुलेआम धमक्या दिल्या जात आहेत, असे ते म्हणाले.

आम्ही मुस्लिम आहोत म्हणून आम्हाला शिक्षा होत आहे. निवडणुकीमुळे हे सर्व केले जात आहे, हे सर्वांना माहिती आहे, असे ते म्हणाले. बुखारी यांनी शुक्रवारच्या नमाजपूर्वी जामा मशिदीत केलेल्या भाषणात या गोष्टी म्हटल्या. बुखारी म्हणाले - कोणताही पक्ष कायम सत्तेत राहणार नाही.



पंतप्रधानांनी परिस्थिती समजून घेऊन लक्ष द्यावे. स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतरही मुस्लिमांना सामाजिक न्याय मिळालेला नाही. सच्चर समितीचा अहवाल याचाच आरसा आहे. आमच्यासाठी आयोग स्थापन होत राहिले पण काही झाले नाही. आमची अवस्था दलितांपेक्षा वाईट आहे. ते म्हणाले की, नुकत्याच घडलेल्या घटनांमुळे देशाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मणिपूर, मेवात, ट्रेनमध्ये मुस्लिम मारले गेले, गुरुग्राममध्ये निष्पाप इमाम मारले गेले, नूंहमध्ये निरपराधांची घरे उद्ध्वस्त झाली. बुखारी म्हणाले- आज मेवातच्या मुस्लिमांची ही अवस्था आहे, त्यांच्याकडे घरे नाहीत, त्यांच्या घरांवर बुलडोझर चालवण्यात आले. चौकशी न करता लोकांची घरे पाडा, असे भारतातील कुठला कायदा सांगतो? आम्ही हिंसेचे समर्थन करत नाही, जे घडले ते वेदनादायक आहे. भारतासारख्या लोकशाही देशासाठी हे चांगले नाही. बुखारी म्हणाले की, मी भारतातील मुस्लिमांच्या वतीने सांगत आहे की, आम्ही सरकारशी चर्चेसाठी तयार आहोत. आमच्याशी बोला, हिंदू नेत्यांशीही बोला आणि मग संयुक्त बैठक घ्या. या परिस्थितीवर उपाय शोधा म्हणजे देशाला या द्वेषाच्या वातावरणातून वाचवता येईल. त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांना मन मोठे करून मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींशी बोलण्याचे आवाहन केले.

### जातीयवाद हा देशाला मोठा धोका आहे

» आज देश जातीयवादाच्या गर्तेत आहे. हा जातीयवाद देशासाठी मोठा धोका आहे. एका धर्माला मानणाऱ्या लोकांना खुलेआम धमक्या दिल्या जात आहेत. मुस्लिमांवर बहिष्कार टाका असे सांगितले जात आहे. ते म्हणाले की, 57 देशांतील मुस्लिमांनी इतर कोणत्याही धर्माच्या लोकांवर बहिष्कार टाकण्याची कधी चर्चा केली आहे का? कालपर्यंत आपण सगळे एकत्र राहत होतो, पण काही धर्मांधांनी या देशातील वातावरण खराब केले आहे. या सर्वांसाठी देश स्वतंत्र झाला का? असा सवाल त्यांनी केला.

# पावसाचे तांडव:

## रुद्रप्रयागमध्ये भूस्खलन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



उत्तराखंडमधील रुद्रप्रयागमध्ये शुक्रवारी झालेल्या भूस्खलनात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. केदारनाथ यात्रेच्या मार्गावर हा अपघात झाला. डोंगरावरून मोठमोठे दगड पडल्याने एक कार त्यात गाडली गेली. तब्बल 12 तासांच्या प्रयत्नानंतर हा ढिगारा हटवण्यात आला. शनिवारी कारमध्ये पाच मृतदेह आढळून आले. हे सर्वजण गुजरातमधून केदारनाथच्या दर्शनासाठी आले होते. दुसरीकडे, चंदीगड-मनाली राष्ट्रीय महामार्गावर, मंडीच्या सहा मैलांवर शुक्रवारी संध्याकाळी उशिरा चालत्या अल्टो कारवर दगड पडल्याने पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला.

भारतीय हवामान विभागाने बिहार, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल, पंजाब या ईशान्येकडील राज्यांसह 13 राज्यांमध्ये पुढील 24 तास मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे.

उत्तराखंडमध्ये ऑरेंज अलर्ट आहे. येत्या २४ तासांत राज्यात कुठेही मुसळधार पावसाचा अंदाज नाही. तथापि, भोपाळ, उज्जैन, इंदूर, नर्मदापुरमसह अनेक शहरांमध्ये हवामान बदलू शकते. भोपाळमध्येही रिमझिम पाऊस पडू शकतो. जबलपूर-ग्वाल्हेरमध्ये हवामान असेच राहण्याचा अंदाज आहे. बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये संततधार पावसामुळे नद्यांना पूर आला आहे.

सुपौल, दरभंगा आणि मुझफ्फरपूरमधील सखल भाग पुराच्या विळख्यात आहेत. नदीकाठची गावे जलमय झाली आहेत. हवामान खात्याने आज बिहारमधील 9 जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा जारी केला आहे. शिमला हवामान केंद्राने मंडी, कांगडा, शिमला, कुल्लू आणि सिरमौर जिल्ह्यांमध्ये पुढील काही तासांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यादरम्यान चंबा, सोलन आणि लाहौल स्पितीच्या काही भागात मुसळधार पाऊस पडू शकतो.

# विरोधकांचा मणिपूरशी विश्वासघात!

## » पंतप्रधान मोदी यांचा विरोधकांवर आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आम्ही सुरुवातीपासूनच मणिपूर हिंसाचारावर संसदेत चर्चा करण्याच्या बाजूने होतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी म्हटले. विरोधी पक्षातील लोकांना फक्त राजकारण करायचे होते. त्यांनी अविश्वास प्रस्ताव आणला, नंतर मतदानातून पळ काढला. विरोधकांनी मणिपूरचा विश्वासघात केला, असे मोदी म्हणाले.**



पश्चिम बंगालमधील हावडा येथे आयोजित भाजपच्या पंचायत राज परिषदेच्या कार्यक्रमात मोदींनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ही माहिती दिली. बंगाल आणि मणिपूर हिंसाचारावर विरोधकांची भूमिका आणि त्यांच्या 9 वर्षांच्या कार्यकाळाबद्दलही पंतप्रधान बोलले.

पंतप्रधान म्हणाले, 'आम्ही संसदेत विरोधकांच्या अविश्वास प्रस्तावाचा पराभव केला आणि देशभरात नकारात्मकता पसरवणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिले. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मधूनच पळ काढला. अविश्वास ठरावावर मतदान करताना त्यांना भीती वाटली हे सत्य आहे.

भाजपवाले अहंकार न बाळगता काम करून लोकांची मने जिंकत आहेत, असेही ते म्हणाले. पंतप्रधानांनी संसदेत 2 तास 13 मिनिटे भाषण केले. त्यात शेवटी फक्त दोन मिनिट ते मणिपूरवर बोलले. मणिपूर अनेक महिन्यांपासून जळत आहे. लोक मारले जात आहेत, बलात्कार होत आहेत लहान मुलांना मारले जात आहे.

दुसरीकडे पंतप्रधान संसदेत हसून हसून बोलत होते. जोक करत होते, हसून बोलत होते. हे पंतप्रदानांना शोभत नाही, अशी टीका राहुल गांधींनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत नरेंद्र मोदींवर केली. मणिपुरात शांततेचा सूर्य निश्चितपणे उगवेल, तिथे काँग्रेस हेच समस्येचे मूळ आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी लोकसभेत अविश्वास प्रस्तावाला उत्तर देताना काँग्रेसवर टीकेची झोड उठवली.

विरोधी आघाडी INDIAच्या अविश्वास प्रस्तावाला उत्तर देताना मोदींनी ५:०९ ला संबोधन सुरू केले. २ तास १२ मिनिटांच्या भाषणात त्यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. सायंकाळी ६.४० वाजता विरोधकांनी सभात्याग केला.

त्यानंतर मोदी म्हणाले, कालच गृहमंत्र्यांनी मणिपुरातील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली होती. कोर्टाचा निकाल आल्यानंतर हिंसाचार भडकला. दरम्यान, मोदींच्या उत्तरानंतर आवाजी मतदानाने प्रस्ताव फेटाळला गेला.

### विरोधी पक्षनेते मणिपूरवर काहीही बोलले

» संसदेच्या अधिवेशनादरम्यान विरोधकांच्या वृत्तीवर पंतप्रधान म्हणाले, 'अविश्वास प्रस्तावावर बोलताना विरोधक कोणतेही तर्कहीन आरोप करत होते. विरोधकांना मणिपूरवर बोलायचे नाही त्यामुळे विरोधक काहीही तर्कहीन बोलत होते, असे ते म्हणाले.

# 20 वर्षांपासून वडिलांना भेटलेली नाही जिया



बिग बॉस OTT 2 चा ग्रँड फिनाले 14 ऑगस्ट रोजी होणार आहे. ग्रँड फिनालेच्या अवघ्या 4 दिवसांपूर्वी जिया शंकर शोमधून बाहेर पडली. जियाच्या एलिमिनेशनसोबतच, बिग बॉस ओटीटी 2 ला टॉप 5 फायनलिस्ट मिळाले आहेत. शोमधून बाहेर पडल्यानंतर मीडियाशी बोलताना जियाने तिच्या वडिलांबद्दल माहिती दिली. तिने सांगितले की, तिचे वडील तिला 20 वर्षांपासून तिला भेटले नाहीत, तिला त्यांची आठवण येते. याआधीही जियाने बिग बॉसच्या घरात तिच्या वडिलांचा अनेकदा उल्लेख केला आहे. एलिमिनेशनच्या आधीही तिने स्पर्धक एल्विश यादवला सांगितले की. तिचे वडील खूप दिवसांपासून भेटलेले नाहीत. दुसऱ्या लग्नापासून त्यांना एक मुलगी देखील आहे आणि ते त्यांच्या कुटुंबात आनंदी आहेत. जिया अशा क्षणांबद्दल उघडपणे बोलली जेव्हा तिला तिच्या वडिलांची सर्वात जास्त आठवण येते. ती म्हणाली- जेव्हा मी इतर कुटुंबांना एकत्र पाहते तेव्हा मला त्यांची आठवण येते. जेव्हा जेव्हा एखादी वृद्ध व्यक्ती मला काही बोलते आणि नंतर मी त्यांना काहीही बोलू शकत नाही तेव्हा अशा क्षणांमध्ये मला त्यांची आठवण येते. 'जेव्हा मी लहान होतो आणि कोणी मला काही बोलायचे, तेव्हा मी माझ्या वडिलांकडे धावत असे. मी त्यांच्याकडे जाऊन तक्रार करायचे, मग ते नेहमी माझी बाजू घेत असे. त्यांनी माझ्यावर खूप प्रेम केले, माझे संरक्षण केले. आता जेव्हा जेव्हा मला असुरक्षित किंवा अशक्त वाटते तेव्हा मला त्यांची खूप आठवण येते. एलिमिनेशनपूर्वीच जियाने शोचा स्पर्धक एल्विश यादवशी तिच्या वडिलांबद्दल बोलली होती. एल्विश आणि जिया दोघेही बागेच्या परिसरात फिरत होते. त्यावेळी जेव्हा एल्विशने जियाला विचारले की तिला वडिलांशी बोलणे आवडत नाही का? आम्ही एकमेकांशी बोलत नाही.

## इशिताने मुलाचे नाव वायु ठेवले

दृश्यम फेम अभिनेत्री इशिता दत्ता आणि वत्सल सेठ 19 जुलै रोजी आई-वडील झाले. इशिताने एका मुलाला जन्म दिला आहे. नुकतेच दोघांनीही आपल्या मुलाचे नाव ठेवले आहे. या सोहळ्याचा व्हिडिओ शेअर करत त्यांनी आपल्या मुलाचे नाव उघड केले आहे. वायुसेठ असे मुलाचे नाव आहे. इशिताने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये तो आपल्या मुलाचा कार्यक्रम पारंपारिक गुजराती विधी करताना दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना जोडप्याने त्यांच्या इंस्टाग्रामवर लिहिले, 'आमच्या लहान मुलाचा नामकरण समारंभ. वायु सेठ, सर्वांच्या प्रेम आणि आशीर्वादाबद्दल धन्यवाद. इशिता दत्ताने 2017 मध्ये बॉलिवूड अभिनेता वत्सल सेठसोबत मोठ्या थाटात लग्न केले. आता लग्नाला 5 वर्षे पूर्ण झाली असून हे जोडपे आई-वडील झाले आहेत. इशिता ही बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री तनुश्री दत्ताची



## करीना-सैफमुळे सारा होती खूश



सारा अली खान आज 28 वर्षांची झाली आहे. ती 5 वर्षांपासून चित्रपटसृष्टीत सक्रिय असून एकूण 7 चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे. नवाब कुटुंबात जन्मलेली सारा आई-वडिलांना पाहून अभिनय क्षेत्रात आली. सुरुवातीच्या काळात कधी लठ्ठपणामुळे तर कधी अभिनयामुळे तिला ट्रोल व्हावे लागले. मात्र, कुटुंब आणि आत्मविश्वासाच्या बळावर ती पुढे जात राहिली. त्याच वेळी, ती नेहमीच करीना कपूरची मोठी चाहती होती. करिनाने आपल्या कुटुंबाचा भाग व्हावे अशी तिची इच्छा होती. सारा अली खानचा जन्म 12 ऑगस्ट 1995 रोजी मुंबईत पतौडी कुटुंबात झाला. वडील सैफ अली खान आणि आई अमृता सिंग हे दोघेही चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध चेहरे होते. साराही तिच्या आई-वडिलांना पाहून अभिनेत्री होण्याचे स्वप्न पाहायची. ती 4 वर्षांची झाल्यावर तिच्या आईने एका शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रवेशासाठी कॉल केला. आईने मुख्याध्यापकासमोर साराचे खूप कौतुक केले आणि सांगितले की ती अभ्यासात खूप चांगली आहे. यावर मुख्याध्यापकांनी साराशी बोलायचे असल्याचे सांगितले. सैफ अली खान आणि अमृता सिंग यांचे नाते केवळ 13 वर्षे टिकले. यानंतर दोघांचा घटस्फोट झाला. त्याच वेळी, सारा 17 वर्षांची असताना सैफ अली खानने करीना कपूरसोबत दुसरे लग्न केले. साराला जेव्हा तिच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळाली तेव्हा तिला खूप आनंद झाला. वास्तविक, जेव्हापासून साराने कभी खुशी कभी चित्रपट पाहिला तेव्हापासून ती करीना कपूरच्या व्यक्तिरेखेने खूप प्रभावित झाली होती. करीनाने कोणत्याही प्रकारे तिच्या कुटुंबाचा एक भाग व्हावे अशी तिची इच्छा होती. वडिलांच्या आयुष्यात दुसरं कुणीतरी प्रवेश करणार असल्याचं लग्नाच्या बातमीने तिला अजिबात वाईट वाटलं नाही. ही बातमी ऐकून ती आईकडे गेली आणि लग्नात काय घालू हे विचारू लागली. यावर अमृताने डिझायनरला बोलावून तिच्यासाठी सर्वात सुंदर ड्रेस डिझाईन करण्यास सांगितले. सैफ आणि करिनाच्या लग्नात तिने अनारकली सूट परिधान केला.

## जितेंद्र यांनी खरेदी केली लक्झरी कार

बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांनी नुकतीच एक नवीन रेंज रोव्हर एसयूव्ही कार खरेदी केली आहे. बातमीनुसार, कारची किंमत करोडोंमध्ये आहे. दिग्गज अभिनेत्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये ते त्याच कारमधून शनी मंदिरात दर्शनासाठी आले होते. लोकप्रिय व्हिडिओमध्ये, जितेंद्र यांची कार शनी मंदिराबाहेर उभी होती, जिथे दर्शन घेण्यासाठी आले होते. येथे काही काळ थांबून त्यांनी दर्शन घेतले आणि नंतर आपल्या गाडीतून निघून गेले. आपल्या आवडत्या अभिनेत्याला पाहून मंदिरात आलेल्या लोकांनी जितेंद्रसोबत सेल्फी काढण्याची विनंती केली. त्यांना पाहताच मंदिराभोवती गर्दी झाली. अभिनेत्याने तेथे आलेल्या चाहत्यांसह छायाचित्रे क्लिक केली आणि त्यांचे आभार मानले. कार ब्लॉग इंडियाच्या रिपोर्टनुसार, जितेंद्रने रेंज रोव्हरची एसयूव्ही कार खरेदी केली आहे, ज्याची नवीनतम किंमत सुमारे 2.38 कोटी रुपये आहे. मात्र, कारची खरी किंमत काय आहे, याबाबत कोणतीही ठोस माहिती नाही.

## भाईजानवरही गदर-2 चा फिवर !

सध्या बॉलिवूडमध्ये सनी देओलच्या गदर 2 आणि अक्षयच्या OMG 2 ची चर्चा आहे. या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली असली तरी सनी पाजीच्या गदर 2 ने यात बाजी मारली आहे. गदरची क्रेझ चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून आली. तब्बल 23 वर्षांनी या चित्रपटाचा सिक्वेल आला आणि प्रेक्षकांनी या चित्रपटाला भरभरुन प्रेम दिलं. या चित्रपटाला मिळणारा प्रतिसाद पाहिल्यानंतर बॉलिवूडचा भाईजान सलमान खानही स्वतःला गदर 2 चं कौतुक करण्यापासून थांबवू शकला नाही.

त्याने देखील सनी देओलचं आणि पूर्ण टिम खुप कोतूक करत पोस्ट शेयर केली. गदर 2 बाबत सलमाननं सोशल मीडियावर एक पोस्ट शेयर करत या चित्रपटाच्या कमाई बाबत अपडेट दिली . गदर 2 चे पोस्टर शेअर करताना सलमान खानने लिहिलं की, 'ढाई किलो का हाथ 40 कोटींच्या ओपनिंग बरोबर आहे. सनी पाजीने कमाल केली. गदर 2 च्या संपूर्ण टीमचे अभिनंदन.' गदर 2 ने पहिल्याचं दिवशी बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. या चित्रपटाने पहिल्या दिवशी 40 ते 45 कोटींची कमाई केली आहे. या कमाईनुसार आता पठाण नंतर सर्वात मोठी ओपनिंग देणारा दुसरा सिनेमा गदर 2 ठरला आहे. आता लवकरच हा सिनेमा 100 कोटींचा टप्पा पार करेल अशी अपेक्षा चाहत्यांना आणि चित्रपटाच्या निर्मात्यांना देखील आहे. सनी देओल आणि अमिषा पटेल यांच्या 2001 मध्ये आलेल्या गदर: एक प्रेम कथा या चित्रपटाचा सिक्वेल असलेल्या या सिनेमात सनी देओल आणि अमिषा पटेल यांच्या सुपरहिट जोडी व्यतिरिक्त उत्कर्ष शर्मा, सिमरत कौर आणि मनीष वाधवा सारखे कलाकार या चित्रपटात आहेत. या चित्रपटाला समिक्षकांच्या देखील समिश्र प्रतिसाद मिळाला आहे. काहींनी हा चित्रपट फुल मनोरंजन करणारा वाटला तर काहींना निव्वळ कंटाळवाणा. आता त्यातच सलमान खानचं चित्रपटाचं कौतुक केल्यानंतर आता भाईजानचे चाहतेही हा चित्रपट पाहण्यासाठी उत्सूक दिसताय.

# हॉकी संघाची फायनलमध्ये धडक

## » आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी : 5-0 ने जपान संघावर मात

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**फॉर्मात असलेल्या कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या (२३ वा मि.) नेतृत्वाखाली यजमान भारतीय संघाने शुक्रवारी आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेच्या फायनलमध्ये धडक मारली. तीन वेळच्या चॅम्पियन भारतीय संघाने उपांत्य सामन्यात जपानचा पराभव केला. यजमान भारताने ५-० अशा फरकाने एकतर्फी विजयाची नोंद केली.**



आकाशदीप (१९ वा मि.), कर्णधार हरमनप्रीत (२३ वा मि.), मनप्रीत सिंग (३६ वा मि.), सुमीत (३९ वा मि.) आणि कार्थीने (५१ वा मि.) यांनी गोल करून भारताचा अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित केला. लढतीत सर्वोत्तम कामगिरी करणारा मनप्रीत सिंग हा सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. आता भारताला चौथ्यांदा आशियाई चॅम्पियन होण्याची संधी आहे.

### मलेशियाने पहिल्यांदाच गाठली फायनल

» अझराई (३ रा मि.) जझलान (९, २१ वा मि.), सिल्वेरियस (४७, ४८ वा मि.) आणि सारीने (१९ वा मि.) सरस खेळीतून मलेशिया संघाला शुक्रवारी स्पर्धेच्या फायनलचे तिकीट मिळवून दिले. मलेशिया संघाने विजयी मोहिम कायम ठेवताना अंतिम फेरीचा पल्ला गाठला. आतापर्यंतच्या चार वेळच्या कांस्यपदक विजेत्या मलेशिया संघाने उपांत्य फेरीत दक्षिण कोरियाचा पराभव केला. मलेशिया संघाने ६-२ अशा फरकाने सामना जिंकला. यामुळे गत चॅम्पियन कोरिया संघाचा पराभव झाला. यजमान भारतविरुद्ध पराभवातून सावरलेल्या पाकिस्तान संघाने पाचव्या स्थानासाठीचा सामना जिंकला. पाक संघाने सामन्यात चीनचा पराभव केला. तीन वेळच्या चॅम्पियन पाक संघाने ६-१ ने सामना जिंकला.

यासाठी भारत आणि मलेशिया संघांत आज शनिवारी अंतिम सामना होणार आहे. मलेशियाने उपांत्य फेरीत दक्षिण कोरियाचा पराभव केला. आता भारतीय संघाने आपल्या घरच्या मैदानावर शेवटच्या मिनिटांपर्यंत वर्चस्व अबाधित ठेवले. यामुळे जपानला शेवटपर्यंत एकही गोल करता आला नाही. यातून जपानचे फायनलचे स्वप्न भंगले.

---

# पुजाराचा पुनरागमनाचा दावा

## » इंग्लंडच्या स्पर्धेत केली शतकी खेळी

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील पराभवानंतर टीम इंडियातून वगळण्यात आलेल्या चेतेश्वर पुजाराने इंग्लंडमधील स्पर्धेत शतकी खेळी केली आहे. इंग्लंच्या वन डे कप स्पर्धेत ससेक्सकडून खेळताना त्यानं सोमरसेटच्या विरोधात ही खेळी केली. त्याने केलेल्या 117 धावांच्या जोरावर ससेक्सने 4 विकेटने विजय मिळवला आहे.**



या साम्यान सॉमरसेट संघाने प्रथम फलंदाजी करताना 50 ओव्हरमध्ये 6 गडी गमावून 318 धावा केल्या. त्यात सॉमरसेटच्या अँड्र्यू होप (119) आणि कर्टिस कॅम्फर (101) यांनी शतके झळकावली. त्याच्या प्रत्युत्तरात ससेक्स संघाने 48.1 षटकांत 319 धावांचे लक्ष्य पार केले. ससेक्ससाठी पुजाराने नाबाद 113 चेंडूत 117 धावा केल्या. त्याने या खेळीत 11 चौकार लगावले. पुजारा सध्या भारतीय संघातून बाहेर आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आले होते. WTC फायनलमध्ये पुजाराला चांगली कामगिरी करता आली नाही. या सामन्यात त्याने केवळ 21 धावा केल्या. तसेच गेल्या 10 कसोटी सामन्यांमध्ये पुजाराच्या बॅटमधून केवळ एक अर्धशतक आले आहे. त्यामुळे पुजाराला वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून वगळण्यात आले होते. त्याच्या जागी यशस्वी जैस्वालची संघात निवड करण्यात आली.

### लिस्ट ए मध्ये 16 वे शतक

» या खेळीद्वारे चेतेश्वर पुजाराने टीम इंडियात पुनरागमनाचा दावा ठोकला आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे. या शतकामुळे पुजाराने लिस्ट ए मध्ये 5500 धावा पूर्ण केल्या आहेत. लिस्ट ए कारकिर्दीतील त्याचे 16 वे शतक ठरले. पुजाराने आतापर्यंत 121 लिस्ट ए सामन्यांत 58.48 च्या सरासरीने 5556 धावा केल्या आहेत. पुजाराने या फॉरमॅटमध्ये 33 अर्धशतके झळकावली आहेत. लिस्ट ए मध्ये पुजाराची दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च सरासरी आहे.

### इंडिजच्या मालिकेतून वगळले

» पुजारा सध्या भारतीय संघातून बाहेर आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आले होते. WTC फायनलमध्ये पुजाराला चांगली कामगिरी करता आली नाही. त्याच्या जागी यशस्वी जैस्वालची संघात निवड करण्यात आली. या सामन्यात त्याने केवळ 21 धावा केल्या. तसेच गेल्या 10 कसोटी सामन्यांमध्ये पुजाराच्या बॅटमधून केवळ एक अर्धशतक आले आहे. त्यामुळे पुजाराला वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून वगळण्यात आले होते.

---

# जसप्रीत बुमराह आता अडचणीत

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

भारत आणि आयर्लंड यांच्यात १८ ऑगस्टपासून टी-20 मालिका सुरू होणार आहे. तीन सामन्यांची ही मालिका डब्लिनमध्ये खेळवली जाणार आहे. टीम इंडियाने या मालिकेसाठी जसप्रीत बुमराहला कर्णधार बनवले आहे. भारताच्या आयर्लंड दौऱ्यापूर्वी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. या दौऱ्यात मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि त्याचा सपोर्ट स्टाफ बुमराहसोबत जाणार नाही.

त्याचबरोबर व्हीव्हीएस लक्ष्मणही जाणार नाही. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि त्याच्या सपोर्ट स्टाफला विश्रांती देण्यात आली आहे. तो बराच काळ टीम इंडियासोबत काम करत असून त्याला ब्रेक घेता आला नाही. या कारणामुळे द्रविड टीम इंडियासोबत आयर्लंडला जाणार नाही. व्हीव्हीएस लक्ष्मणही त्यांच्यासोबत जाणार नाही. लक्ष्मण आणि द्रविड खूप अनुभवी आहेत.

मात्र ते आयर्लंड दौऱ्यावर नसतील. यामुळे युवा खेळाडूंचे काही प्रमाणात नुकसान होऊ शकते. भारताने आयर्लंड दौऱ्यासाठी बहुतांश युवा खेळाडूंची निवड केली आहे. द्रविड-लक्ष्मण यांच्या अनुपस्थितीत टीम इंडियाच्या सपोर्ट स्टाफमध्ये सितांशु कोटक आणि साईराज बहुतुले यांना संधी दिली जाऊ शकते. साईराज हा टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू आहे. देशांतर्गत सामन्यांमध्ये त्याचा विक्रम चांगला आहे. साईराजचा कोचिंगमध्येही चांगला रेकॉर्ड आहे. सितांशु हा देशांतर्गत सामन्यांचा खेळाडू राहिला आहे. क्रिकेटमधून ब्रेक घेतल्यानंतर तो कोचिंगमध्ये व्यस्त आहे.

विशेष म्हणजे टीम इंडियाने ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, रिंकू सिंग आणि वॉशिंग्टन सुंदर यांना आयर्लंड दौऱ्यासाठी संधी दिली आहे. शिवम दुबे, शाहबाज अहमद, संजू सॅमसन आणि जितेश शर्मा हे देखील संघात आहेत. तसेच बुमराहच्या खांद्यावर कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. आवेश खान, रवी बिश्नोई, मुकेश कुमार आणि प्रसिद्ध कृष्णा यांनाही संधी मिळाली आहे.